I.O.

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नांदेड **P.S.(ठाणे):** किनवट

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0169 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**03/06/2025 22:52

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 03/06/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 03/06/2025
**Time From (वेळेपासून):** 11:42 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 03/06/2025 **Time (वेळ):** 22:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 028

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/06/2025 22:39 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शंकर चाडावार यांचे येथील ,बिल्डींगमधील , राजेंद्र नगर किनवट ,किनवट

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): प्रेम बळीराम राठोड

(b) **Father's Name** (वडील चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1978

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | आंजी पोस्ट पांधरा ता किनवट,किनवट ,किनवट,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | आंजी पोस्ट पांधरा ता किनवट,किनवट ,किनवट,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9370936245

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | भाग्यश्री भिमराव तेलंगे | | वडील का नाम : भिमराव | 1. हनूमान मंदिर समोर गोकूंदा , किनवट ,किनवट,नांदेड,महाराष्ट्र, भारत |
| 2 | सूजाता शंकर गवले | | वडील का नाम : शंकर | 1. एकता नगर गोकूंदा ,किनवटा , किनवट,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 16000 | 16,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

16,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दि. 03/06/2025
फिर्याद
मी प्रेम बळीराम राठोड, वय 47 वर्ष, व्यवसाय शेती, रा. आंजी, पोस्ट पांधरा, ता. किनवट, जि. नांदेड. मो.नं. 9370936245, आधार कार्ड क्रमांक 761246614559, ई मेल आयडी-pr213127@gmail.com समक्ष पोलीस स्टेशन किनवट ता. किनवट, जि.नांदेड येथे हजर येवून फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असून शेती व्यवसाय करतो. मला मौ. पांधरा षिवारात शेत सर्वे नंबर 16 मध्ये एकुण 2 हेक्टर 79 आर वडीलोपार्जीत शेती आहे.

माझे वडीलोपार्जीत शेतीमधून अर्धी शेती मी माझी पत्नी नामे सौ. सपना प्रेमसिंग राठोड हीचे नावावर 1 हेक्टर 39 आर शेती वाटणी करून मिळणेकरिता तलाठी, मौ. पाधंरा, सज्जा सिंदगी (मो.) ता. किनवट, जि. नांदेड यांच्या कार्यालयात दि. 01/04/2025 रोजी वाटणी फेरफार मंजूर करणे बाबत अर्ज दिला होता.

मी माझे वाटणीचे अर्जाबाबत मौ. पाधंरा, सज्जा सिंदगी (मो.) ता. किनवट येथील तलाठी श्रीमती तेलंगे मॅडम यांची दि. 27/05/2025 रोजी किनवट तहसिल कार्यालयाचे बाजूला असलेले तलाठी कार्यालयात भेट घेतली व त्यांना माझे वाटणीचे कागदपत्रे दाखविली. तलाठी तेलंगे मॅडम यांनी माझे कागदपत्रे पाहिले. त्यांनी मला तुमच्या पत्नीच्या नावावर शेत करण्यासाठी चाळीस हजार रूपये लागतील असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना मॅडम खुप जास्त होत आहे. मी काय दुस-याकडून शेती खरेदी केली नाही, काही नाही. माझी वडीलोपार्जीत शेतीमधून अर्धी शेती माझे पत्नीचे नावावर करायची आहे असे सांगितले. तेव्हा त्यांनी मला रक्तातील नातेवाईक असले तर, कमी पैशे लागतात. पत्नीचे नावावर करण्यासाठी चाळीस हजार रूपयेच लागतात असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना इकडून तिकडून ओळख दाखवून काही कमी जास्त करा अशी विनंती केली असता, त्यांनी मला वीस हजार रूपये व नंतर सतरा हजार रूपये होतात. यापेक्षा काही कमी होणार नाही. आता आणले का सतरा हजार रूपये, लगेच मी नोटीस काढते, आणि पुढच्या 15 दिवसात 7/12 वर तुमच्या पत्नीचे नाव येवून जाते असे सांगितले. तेव्हा मी त्यांना सध्याला माझेकडे पैशे नाहीत असे म्हणालो असता, त्यांनी मला सतरा हजार रूपये घेवून या, मी तुमचे काम लगेच करून टाकते असे म्हणाल्या.

वरील लाच मागणी संबंधाने मी दि. 29/05/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे तक्रार दिली होती.

माझे वरील तक्रारीचे अनुषंगाने व मला दिलेल्या सुचने प्रमाणे आज दिनांक 03/06/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नांदेड येथील पोलीस उप अधीक्षक श्री प्रशांत पवार साहेब यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी माझे मोटार सायकलवर मौ. दुधगाव शिवारात निर्जनस्थळी येवून थांबलो. त्याठिकाणी ला.प्र.वि. चे अधिकारी, अंमलदार व दोन पंच असे शासकीय वाहनाने आले. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्री प्रशांत पवार साहेब यांनी मला सापळा कार्यवाही कामी उपस्थित शासकिय पंच क्र 1) भगीरथ प्रल्हाद ठाकरे, वय 37 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद -कनिष्ठ लिपिक, नेमणूक प्रादेशिक परिवहन कार्यालय, नांदेड, 2) संध्या भ्र. शाम बिराजदार, वय 35 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद -कनिष्ट लिपिक, नेमणूक प्रादेशिक परिवहन कार्यालय, नांदेड व सापळा पथकातील सद्स्य पोनि प्रिती जाधव मॅडम, पोलीस अंमलदार सपोउपनि शेख रसुल, पोकाँ/अरशद अहेमद खान, पोकाँ/सय्यद खदीर या सर्व सदस्याची ओळख करून दिली. त्यानंतर मी पंचा समक्ष माझी तोंडी तक्रार सांगितली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक प्रशांत

पवार साहेब यांनी त्यांचेकडे मी दि. 29/05/2025 रोजी दिलेली लेखी तक्रार पंचाना वाचण्यास दिली. पंचानी तक्रार वाचुन मी दिलेली लेखी तक्रार व पंचा समक्ष तोंडी सांगितलेली तक्रार एकसारखीच असल्याची खात्री करून सदर तक्रारीवर दोन्ही पंचानी सहया केल्या.ज्यावर मी व पोलीस उप अधीक्षक श्री प्रशांत पवार साहेब यांनी पुर्वीच सहया केलेल्या आहेत.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री प्रशांत पवार साहेब यांनी लाच मागणी पडताळणीचा उद्देश सांगुन मला व दोन्ही पंचाना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड बाबत माहिती दिली.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री प्रशांत पवार साहेब यांनी दोन्ही पंच, सापळा पथक व मला लाचमागणी पडताळणी कार्यवाहीच्या अनुशंगाने सुचना दिल्या.

त्यानंतर 11.42 वा. पोकॉ/सय्यद खदीर यांनी पोलीस उप अधीक्षक श्री प्रशांत पवार साहेब यांचे सुचने प्रमाणे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर माझे गळयात घालून दिल्याने लाचमागणी पडताळणी करीता मी व सोबत पंच क्रमांक 1 भगीरथ ठाकरे असे माझी होंडा ड्रिमयुगा मोटार सायकल क्रमांक एमएच 26 ए.क्यु 3123 ने लोकसेविका तलाठी तेलंगे मॅडम व तलाठी गवले मॅडम यांची भेट घेण्यासाठी किनवट येथील त्यांचे तलाठी सज्जा कार्यालयात रवाना झालो.

मी व पंच क्रमांक 1 असे किनवट येथील कोर्टाच्या समोर असलेले शंकर चाडावार, रा. किनवट यांच्या राजेंद्र नगर, किनवट येथील बिल्डींग मधील तलाठी सज्जा कार्यालयात गेलो. त्याठिकाणी तलाठी तेलंगे मॅडम बसलेल्या होत्या. तेव्हा मी तेलंगे मॅडम यांना नमस्कार करून माझे कामाबाबत विचारले असता, त्यांनी माझी बदली झाली, आता तुमचे काम गवले मॅडम कडे आहे असे सांगितले. तेव्हा मी त्यांना तुम्ही त्या दिवशी बोलले आता, गवले मॅडमला बोलायच का, असे म्हणून मी गवले मॅडम यांच्या टेबलसमोर जावून खुर्चीवर बसलो. तेव्हा मी त्यांना गवले मॅडम यांना मॅडम माझे कामाचं काही तरी कमी जास्त करा की, असे बोललो असता, त्यांनी तेलंगे मॅडमने सांगितलं तेच असे म्हणाल्या. त्यानंतर त्यांनी माझी फाईल काढून ती तेलंगे मॅडम यांच्याकडे नेली व माझी फाईल दाखवून काही तरी आपसात बोलल्या व परत त्यांच्या टेबलवर येवून बसल्या. त्यानंतर मी त्याठिकाणी खुप गर्दी असल्याने थोडा वेळ थांबून तेलंगे मॅडम यांना ''तुम्ही त्यादिवशी सांगितलेली रेंज लई व्हायली, काही तरी कमी करा'' असे म्हणून विनंती केली असता, त्यांनी ''तुमच्या मनाने सांगा, असे म्हणून तलाठी गवले मॅडम यांना म्हणाल्या की, ''तू सांग ना सुजाता, तुला काय करायचं, तुला वाटलं तर कर, नसता फाईल देवून टाक वापस'' असे म्हणाल्या. त्यानंतर पुन्हा तेलंगे मॅडम म्हणाल्या की, ''एकाच गोष्टीला दहा वेळेस सांगायला वेळ नाही, मग, तीन हजार रूपये कमी केले'' असे तेलंगे मॅडम म्हणाल्या. तेव्हा मी त्यांना ''त्यादिवशी आपलं सतरा हजारावर झालतं'' असे म्हणालो. तेव्हा त्यांनी ''अठरा, अठरा सांगले होते'' असे म्हणाल्या. तेव्हा मी त्यांना ''अठरा हजार आणाव की सोळा हजार आणाव'' असे विचारले असता, त्यांनी मला ''सोळा हजार'' असे म्हणाले. तेव्हा मी गवले मॅडम यांना, ''मॅडम तुमचं काम चलू द्या मी वीस, पंचवीस मिनीटांत येतो'' असे म्हणून तेथून निघून सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी मौ. दुधगाव शिवारात पंच क्र. 1 सह परत आलो.

पोलीस उप अधीक्षक श्री पवार साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील लाच मागणी पडताळणी मधील संभाषण ऐकून लाच मागणी झाल्याची खात्री केली व लाच स्विकृतीसाठी सापळा आजमाविण्याचे ठरले. त्याप्रमाणे मी व पंच क्र. 1 असे दोघे माझे मोटार सायकलने तलाठी सज्जा कार्यालय, किनवट येथे तलाठी तेलंगे व तलाठी गवले मॅडम यांची भेट घेण्यासाठी गेलो. तेव्हा त्यांनी मला थोडा वेळ थांबविले. त्यानंतर मला आत बोलावून घेतले. तेव्हा मी तलाठी तेलंगे व तलाठी गवले मॅडम यांना भेटलो असता, ते दोघी जणी एकमेकांचे शेजारी बसलेल्या होत्या. तेव्हा मी तेलंगे मॅडम यांना ठरल्याप्रमाणे सोळा हजार रूपये अँन्थ्रासिन पावडरयुक्त लाचेची रक्कम समोर धरली असता, त्यांनी त्यांच्या डाव्या हाताने लाचेची रक्कम स्विकारली व मला म्हणाले की, ''किती आहेत'', तेव्हा मी त्यांना ''मोजून घ्या की'', असे म्हणालो असता, त्यांनी ''सोळा हजार आहेत का ?'' असे म्हणाल्या. तेव्हा मी त्यांना हो म्हणालो असता, त्यांनी तलाठी गवले मॅडमकडे दिले. त्यांनी ते तेलंगे मॅडमच्या टेबलचे डाव्या ड्रॉवरमध्ये टाकले. त्यानंतर तलाठी तेलंगे मॅडम यांनी तलाठी गवले मॅडम यांना, ''सही करून लगेच देवून टाका त्यांना'' असे म्हणाल्या. तेव्हा तलाठी गवले मॅडम यांनी माझी नोटीसवर सही घेतली. तेव्हा मला तेलंगे मॅडम यांनी कुठे सही करायचे ते सांगितले व त्यानंतर म्हणाल्या की, ''आज किती तारीख आहे, तीन तारीख, अठरा तारखेला सात/बारा घेवून जा'' असे म्हणाल्या. त्यानंतर मी तलाठी सज्जा कार्यालयाचे बाहेर येवून सापळा पथकाला लाच स्विकारल्याचा इशारा दिला. त्यावेळी सापळा पथकातील पोलीस उप अधीक्षक श्री प्रशांत पवार साहेब, पोनि जाधव मॅडम व त्यांचे पथक तलाठी सज्जा कार्यालयाचे रूमध्ये आतमध्ये आले व त्या दोघींना लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडले.

तरी तलाठी भाग्यश्री भिमराव तेलंगे व तलाठी सुजाता शंकर गवले यांनी माझे मौ. पांधरा शिवारात शेत सर्वे नंबर 16

मध्ये एकुण 2 हेक्टर 79 आर वडीलोपार्जीत शेतीतून, माझी पत्नी नामे सपना प्रेमसिंग राठोड हीचे नावावर 1 हेक्टर 39 आर शेती करण्यासाठी मी तलाठी कार्यालय, किनवट येथे रितसर अर्ज दाखल केला. त्यानंतर मी तलाठी तेलंगे व तलाठी गवले यांना आज दि. 03/06/2025 रोजी शासकीय पंचासह भेटलो असता, त्यांनी मला प्रथम अठरा हजार रूपयाची मागणी करून तडजोडीअंती सोळा हजार रूपये द्या अशी तलाठी भाग्यश्री तेलंगे यांनी त्यांचे स्वतःसाठी व तलाठी सुजाता गवले यांच्यासाठी लाचेची मागणी केली. तलाठी सुजाता गवले मॅडम यांनी तेलंगे मॅडम सांगतात त्याप्रमाणे करा असे म्हणुन लाच स्विकारण्यास सहमती दर्शविली. त्यानंतर तलाठी सज्जा कार्यालय, राजेंद्र नगर, किनवट येथे तलाठी भाग्यश्री तेलंगे व तलाठी सुजाता गवले हे एकमेकांशेजारी बसून असतांना माझेकडून शासकीय पंचासमक्ष तलाठी सुजाता गवले यांच्या उपस्थितीत तलाठी भाग्यश्री तेलंगे यांनी अँन्थ्रासिन पावडरयुक्त असलेले सोळा हजार रूपये लाचेची रक्कम त्यांनी त्यांच्या डाव्या हाताने स्विकारली व ती तलाठी गवले मॅडम यांच्याकडे दिली. तलाठी गवले मॅडम यांनी तलाठी तेलंगे मॅडम यांचे टेबलचे डाव्या ड्रॉवरमध्ये ठेवले. म्हणून माझी तलाठी भाग्यश्री भिमराव तेलंगे, सज्जा निचपुर, ता. किनवट, रा. हनुमान मंदिर समोर, गोकुंदा, ता. किनवट, जि. नांदेड व तलाठी सुजाता शंकर गवले, सज्जा कनकवाडी, ता. किनवट, जि. नांदेड, रा. एकता नगर, गोकुंदा, ता. किनवट, जि. नांदेड यांच्याविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7, 7A 12 प्रमाणे कायदेशीर तक्रार आहे. माझी वरील फिर्याद मी वाचून पाहिली, ती मी सांगितल्या प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष ही फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Devidas Jagnnath Chopde(I (Inspector)) / POBN8234 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Rathod

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही)

एस.एस.झाडे
पोलीस उपनिरीक्षक
पोलीस स्टेशन,किनवट

**Name** (नाव): Devidas Jagnnath Cl
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN8234

पोलीस स्टेशन,किनवट ता.किनवट जि.नांदेड सत्यमेव जयते